# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः15.04.2024** **वारःसोमवार**

---

1. समान नागरी कायदा, एक देश एक निवडणूक, मोफत अन्नधान्य वाटप यासह भाजपाचे विविध संकल्प
2. मतदानाची टक्केवारी वाढावी या उद्देशानं जिल्हा प्रशासनांच्या वतीनं विविध मोहिमा
3. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची 133 वी जयंती उत्साहात साजरी
4. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाद्वारे पावणेदोन वर्षात 230 कोटी रुपयांहून अधिक मदत आणि
5. राज्यात अनेक ठिकाणी तापमानाचा पारा चढा राहण्याचा इशारा.

**<u>भाजप जाहीरनामा</u>**

भारतीय जनता पक्षानं लोकसभा निवडणुकांसाठी आपला वचननामा काल नवी दिल्लीत पक्षाच्या मुख्यालयात प्रकाशित केला. संकल्प पत्र असं नाव दिलेल्या या वचननाम्यामध्ये समान नागरी कायदा, एक देश एक निवडणूक, आणि एकल मतदार यादीचं आश्वासन दिलं आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, पक्षाध्यक्ष जे पी नड्डा तसंच राजनाथ सिंह, अमित शहा, निर्मला सीतारामन यासह इतर ज्येष्ठ नेते यावेळी उपस्थित होते. पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत मोफत धान्यवाटप पुढील पाच वर्षं सुरू ठेवण्याचं आणि ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान भारत योजनेत सामावून घेण्याचं आश्वासन भाजपनं दिलं आहे. तीन कोटी लखपती दीदींच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांचं सक्षमीकरण, पंतप्रधान सूर्य घर योजनेअंतर्गत वीज बिलं शून्यावर आणण्याच्या आश्वासनांवर संकल्प पत्रात विशेष भर आहे. याशिवाय देशाला तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्याचा आणि उत्पादनाचं प्रमुख जागतिक केंद्र बनवण्याचाही संकल्प पत्रात समावेश आहे.

**<u>प्रचार</u>**

देशात आरक्षण कायमच राहील, असं भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी म्हटलं आहे. भंडारा जिल्ह्यातील साकोली इथं महायुतीच्या निवडणूक प्रचार सभेत ते काल बोलत होते. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी नागपुरात प्रचार सभेत बोलताना सांगितलं की, भाजप आणि त्यांच्या नेत्यांनी खोटी आश्वासनं दिली असून वचन दिल्याप्रमाणे स्विस बँकेतील पैसे परत आणले नाहीत.

**<u>मतदान जागृती</u>**

लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी राज्यात जिल्हा प्रशासनांकडून प्रकर्षानं प्रयत्न करण्यात येत आहेत. नागरिकांनी अधिकाधिक संख्येनं मतदान करावं यासाठी विविध मार्गांनी जनजागृती करण्यात येत आहे. चंद्रपूर इथं पहिल्या टप्प्यात, 19 तारखेला मतदान होणार असून त्याला आता चारच दिवस राहिले आहेत. तिथं जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी काल नागरिकांच्या घरी जाऊन मतदार चिठ्ठी मिळाली की नाही, याची पडताळणी केली. रायगड जिल्ह्यात पथनाट्य, प्रभात फेरी आदीद्वारे नागरिकांना मतदान करण्यासाठी प्रेरित केलं जात आहे. अलिबाग इथल्या पदफेरीचा आरंभ जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केला. यावेळी अंगणवाडी सेविका वैशाली पाटील यांनी लोकशाहीचा उत्सव हा पोवाडा सादर केला. या फेरीत अंगणवाडी सेविका मदतनीस, आशा सेविकांसह अधिकारी कर्मचाऱ्यांचा मोठ्या संख्येनं सहभाग होता. सिंधुदुर्ग जिल्ह्यात 'मतदान करून लोकशाही बळकट करा' असा संदेश जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक आणि इतर मध्यवर्ती

अधिकाऱ्यांनी एका चित्रफितीच्या माध्यमातून दिला आहे. पुण्यात पिंपरी इथं आयोजित विचार प्रबोधन पर्वामध्ये हजारो नागरिकांनी शंभर टक्के मतदान करण्याची शपथ घेतली. विविध भागातून आलेले आदीवासी बांधवही यावेळी उपस्थित होते.

**गृह मतदान-वाशिम**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत प्रथमच 85 वर्षांहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना आणि दिव्यांग मतदारांना घरून मतदान करण्याची मुभा देण्यात आली आहे. वाशिम जिल्ह्यातील यवतमाळ-वाशिम आणि अकोला लोकसभा मतदारसंघांमध्ये ही प्रक्रिया सुरू झाली असून रिसोड, कारंजा विधानसभा मतदार संघातील एकंदर 811 वयोवृद्ध आणि दिव्यांगांनी गृह मतदान केलं. वाशिम विधानसभा मतदार संघात ही प्रक्रिया 19 आणि 20 एप्रिलला होणार आहे.

**डॉ आंबेडकर जयंती**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची 133 वी जयंती संपूर्ण राज्यात उत्साहात साजरी करण्यात आली. डॉक्टर बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त ठिकठिकाणी प्रशासन, लोकप्रतिनिधी तसंच सामान्य नागरिकांच्यावतीनं त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आलं. ऐकूया अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून......

**मुंबईतल्या चैत्यभूमी परिसरात जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे मतदार जनजागृतीसाठी विशेष स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. या विशेष स्वाक्षरी मोहीम उपक्रमाला राज्यपाल रमेश बैस यांनी भेट दिली. तिथल्या स्वाक्षरी फलकावर स्वाक्षरी करून मतदारांनी दिनांक 20 मे रोजी मतदानाचा हक्क बजावावा असं आवाहन राज्यपालांनी केलं. रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातल्या आंबडवे या डॉ आंबेडकर यांच्या मूळ गावी जिल्हा प्रशासन आणि सामाजिक न्याय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. व्याख्यान, आरोग्य शिबिर आणि ग्रंथप्रदर्शन आदि कार्यक्रम यावेळी घेण्यात आले. परभणी शहरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला भिखू संघाच्या वतीनं सामूहिक महावंदना देण्यात आली, पंचशील ध्वजारोहण समता दलामार्फत फेरी काढून अभिवादन करण्यात आलं. याठिकाणी साहित्यांचं प्रदर्शन आणि मतदान जागृती स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन करण्यात आलं होतं.**

**विविध ठिकाणी लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून डॉ आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी जमलेल्या जनसमुदायामध्ये मतदानाबाबत जागृती करण्यात आली. कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात व्याख्यानं, शोभायात्रा, रक्तदान शिबीरं आयोजित करण्यात आली होती. सांगलीतल्या मिरज शहरातून भीमज्योत रॅली काढण्यात आली. धाराशिव इथं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीनं सघोष मानवंदना देण्यात आली. यानिमित्ताने भीम कन्या अभिवादन रॅलीही काढण्यात आली. तर पालघरमध्ये बुद्ध वंदना घेण्यात आली. वाशिम मध्ये गतवर्षी डॉ आंबेडकर जयंतीनिमित्त लावण्यात आलेल्या 2500 झाडांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.**

**पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी डॉ आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्यावतीने अभिवादन मिरवणुक काढण्यात आली. क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समिती यांच्यावतीने 10 हजार किलो मिसळ आणि 1 लाख नागरिकांना मोफत ताक वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तर झोपडपट्टी सुरक्षा दलाच्या वतीने पुस्तक वाटप करण्यात आलं.**

**रत्नागिरी, सोलापूर, सातारा, धुळे, धाराशिव, अहमदनगर, सिंधुदुर्ग आदि ठिकाणी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. आमच्या ठीकठिकाणच्या वार्ताहरांसह पुण्याहून मंजिरी गानू यांच्यासह प्रशांत जाधव.**

नागपुरातील दीक्षाभूमी इथं केंद्रिय मंत्री नितीन गडकरी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, यांच्यासह हजारो नागरिकांनी डॉक्टर बाबासाहेबांच्या अस्थिकलशाचं दर्शन घेत अभिवादन केलं.

**<u>मुख्यमंत्री मदत</u>**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाद्वारे रुग्णांना गेल्या 1 वर्ष 9 महिन्यांच्या कालावधीत 230 कोटी रुपयांहून अधिक अर्थसहाय्य वितरित करण्यात आलं आहे. कक्षाच्या मुंबई कार्यालयामधून 211 कोटींपेक्षा अधिक तर नागपूर कार्यालयामधून 19 कोटी रुपयांचं अर्थसहाय्य वितरित करण्यात आलं आहे. त्या माध्यमातून 28 हजार 290 गंभीर आजारी रुग्णांचे प्राण वाचू शकले. ही वैद्यकीय मदत ऑनलाईन पद्धतीनंही मिळवता येत असून दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांनी या निधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असं आवाहन मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी केलं आहे.

**<u>उष्माघात-बुलडाणा</u>**

बुलडाणा जिल्ह्यात दररोज तापमानात वाढ होत असून सध्या पारा 42 अंशांच्या वर आहे. जिल्हाभरात उष्माघाताचे 12 रुग्ण आढळले असून त्यांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. उष्माघाताचा त्रास टाळण्यासाठी नागरिकांनी अधिक पाणी प्यावं, बाहेर पडताना डोक्यावर रुमाल बांधावा, शक्यतो सकाळी 11 च्या आत आणि दुपारी 4 नंतर बाहेरची कामं करावीत अशा सूचना जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

**<u>हवामान</u>**

विदर्भ, मराठवाड्याच्या काही भागांमध्ये झालेल्या पावसामुळं काही शहरांमधील तापमानात घट झाली असली तरी आगामी आठवडाभरात पुण्यासह अनेक शहरातील तापमानाचा पारा चढलेलाच राहणार आहे. या आठवड्यात पुण्यातील तापमान 40 अंशाच्या आसपास किंवा त्यापेक्षा काहीसं अधिक राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. विदर्भाच्या अनेक भागात गेल्या  काही दिवसांपासून पावसानं हजेरी लावली असली तरी या आठवड्यात मात्र आकाश निरभ्र राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. पुण्यासह मध्य महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेची शक्यता असल्यानं नागरिकांनी उष्माघातापासून काळजी घ्यावी असं आवाहन हवामान विभागानं केलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.